MHST200016912020

<u>नि.दि.दा.क्र.१८५/२०२३ मधील निशाणी क्र.२९ वरील आदेश</u>

प्रतिवादी क्रं.१ व २ यांनी सदरचा अर्ज त्यांचेविरुद्ध झालेला विना कैफियत रद्द होवुन मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्ज व म्हणणे अवलोकन केले. वादी आणि प्रतिवादींतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

३. प्रतिवादी क्रं.१ व २ यांनी असे कथन केले आहे की, प्रतिवादी यांना मुदतीत कैफियत दाखल करता आली नसल्याने त्यांचेविरुद्ध विना कैफियतीचा आदेश झालेला आहे. अंतिम न्यायनिर्णय गुणावगुणावर होणेसाठी सदर प्रतिवादी यांची कैफियत रेकॉर्डवर येणे आवश्यक आहे. कैफियत दाखल करण्यास परवानगी दिली नाही तर त्यांचे कधीही न भरुन येणारे असे अपरिमीत नुकसान होणार आहे. त्यामुळे त्यांनी अशी विनंती केली की, सदरचा अर्ज मंजुर करणेत यावा.

४. वादी याने सदर अर्जावर म्हणणे देवुन असे कथन केले की, सदर प्रतिवादी हे नि.क्रं.१९ वर पुरशीस देवुन दि.२५.१०.२०२१ रोजी हजर झालेले आहेत. दिनांक १९.०१.२०२२ रोजी त्यांचेविरुद्ध विना कैफियत आदेश झालेला आहे. त्यानंतर सुमारे दोन वर्षानंतर सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. त्यामुळे त्याने अशी विनंती केली की, सदरचा अर्ज खर्चासह नामंजुर करणेत यावा.

५. सदर दावा जाहीर ठराव व निरंतर ताकीद मिळणेबाबत दाखल करण्यात आला आहे. सदरचा दावा गुणावगुणावर निकाली होणे गरजेचे व आवश्यक आहे.

न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून दाव्याचे स्वरुप पाहता प्रस्तूत प्रतिवादी यांना याच न्यायालयात त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक वाटते. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिल्यास वाद मुद्दयांचे निवारण गुणवत्तेवर होणार आहे. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी नाकारल्यास नैसर्गिक न्यायतत्वाचे विरुध्द होईल. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वाचे विरुध्द त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी नाकारल्यास त्यांना न्यायदान नाकारल्यासारखे होणार आहे. त्यामुळे त्यांना त्यांची कैफियत स्वीकारण्याची परवानगी देणे न्यायोचित वाटते. प्रस्तुत प्रतिवादी यांना समन्सची बजावणी दि.२०.१०.२०२१ रोजी अनुक्रमे नि.१५ व नि.१६ नुसार झाली आहे. सदर प्रतिवादी यांचेविरुद्ध विना कैफियत आदेश दि.१९.०१.२०२२ रोजी झालेला आहे. प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज दि.१८.०३.२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्रं.१ व २ यांना कैफियत देण्यास साधारणपणे २ वर्षांपेक्षा अधिक दिवसांचा विलंब झालेला आहे असे दिसुन येते. परंतु, प्रतिवादी हे सरकारपक्ष असल्याने खर्चाबाबत आदेश करणेत येत नाही. सबब, प्रस्तूतचा अर्ज मंजुर होणेस पात्र आहे असे मला वाटते. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे :

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्रं.१ व २ यांचेविरुद्ध विना कैफियत आदेश रद्द करण्यात येवून त्यांची कैफियत स्वीकारणेत येते.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

ANKUSH ATMARAM PACHARNE

Digitally signed by ANKUSH ATMARAM PACHARNE
Date: 2025.09.09 18:01:04 +0530

स्थळ : वाई.
दिनांक : ०८.०९.२०२५

(ए. ए. पाचरण)
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, वाई.